## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ७९२/२०२२/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.शंकर रेवजी तांबे,<br>रा.म्हसणे,<br>ता.पारनेर, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>कक्ष अधिकारी,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक,<br>पिनॅकल मॉल,चौथा मजला, त्र्यंबकनाका<br>सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक-४२२००२. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>उप सचिव,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक,<br>पिनॅकल मॉल,चौथा मजला, त्र्यंबकनाका<br>सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक-४२२००२. | : | प्रतिवादी |

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ नाशिक

**सुनावणी दिनांक – ०९/०१/२०२३**

अपिलार्थी यांनी दिनांक २४/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती दिली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०९/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित**- अपिलार्थी वगळता अन्य पक्षकार उपस्थित

अपिलार्थी यांनी दिनांक २५/१०/२०२१ (प्राप्त दिनांक २८/१०/२०२१) रोजीच्या माहिती अर्जान्वये द्वितीय अपील क्र.१६९५/२०१९ मध्ये दिनांक ११/०६/२०२१ रोजी आयोगाने दिलेल्या आदेशाप्रमाणे माहिती मिळालेली नाही, ती माहिती मिळावी.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये द्वितीय अपील क्र.१६९५/२०१९ मध्ये दिनांक ११/०६/२०२१ रोजी मा.आयोगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांना आपल्या माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती उपलब्ध करुन देण्याचे नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, पारनेर यांना आदेशित केलेले आहे. सदर माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही त्यामुळे ती माहिती आपणास उपलब्ध करुन देता येणार नाही, असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०७/१२/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दिनांक १२/०१/२०२२ रोजी निर्णय पारीत करुन

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविण्यात आलेले असल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २५/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक २६/११/२०२१ च्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे स्पष्ट होते. ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ७९२/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.७९२/२०२२/नाशिक/ओ- ८०५ दि. 03/07/2023